# क्वाण्टम हाय-टेकचे

संकलन : अभिजीत ओव्हाळ
abhijeetovhal66@gmail.com

# क्यूएचएम ४८५ फोल्डेबल हेडफोन




**कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि उच्च दर्जाची आयटी पेरिफिरल्स यांच्या निर्मितीत आघाडीवर असलेल्या आणि अतिशय परवडण्यायोग्य किमतींना उच्च दर्जाची उत्पादने देऊ करण्याकरिता वचनबद्ध असलेल्या क्यूएचएमपीएलने क्वाण्टम हाय-टेक या ब्रँड नावाखाली क्यूएचएम ४८५ हे ऑन द इअर फोल्डेबल हेडफोन दाखल केले आहते. या हेडफोनमध्ये उत्कृष्ट श्रवणीय अनुभवासोबत स्टाईल आणि आरामदायीपणा यांचा मेळघालण्यात आला आहे.**

हलक्या वजनाचे आणि अतिशय आकर्षक असे क्यूएचएम ४८५ फोल्डिंग डिझाईनने युक्त असल्याने स्टोअरेजकरिता सोयीचे होतात. मॅट फिनिशच्या आऊटर हेडबँडमुळे या हेडफोन्सच्या टिकाऊपणाची हमी मिळते. जर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या रफ अँड टफ वापराची सवय असेल आणि उत्तम ध्वनीचा अनुभव घ्यायचा असेल तर क्यूएचएम ४८५ अतिशय आदर्श हेडफोन ठरू शकेल.

नव्याने दाखल करण्यात आलेल्या या हेडफोनमध्ये निओडिमियम मॅग्नेटचा वापर करण्यात आला असल्याने तसेच यातील पेटण्टधारी अकॉस्टिक चेंबर डिझाईनमुळे अतिशय सुस्पष्ट व दुमदुमता ध्वनीचा अनुभव येतो. यातील डबल लेअर्ड इअर शेल्समुळे रेझोनन्स आणि व्हायब्रेशन्स कमी होऊन आवाजातील बारीकसारीक तपशीलही अचूक टिपता येतात. याशिवाय, या हेडफोनमधील व्हायब्रेशन अॅल्युमिनियममुळे ऑडियो कामगिरीमध्ये सुधारणा होण्यात मदत होते. क्यूएचएम ४८५चे सेमी-ओपन बॅक आर्किटेक्चर वापरकर्त्याला उत्कृष्ट बासचा अनुभव देते आणि साऊंड लीकेज कमी करते. हे इअर हेडफोन स्पोर्ट्स परफॉर्मन्स क्लॉथपासून बनवण्यात आल्याने कित्येक तासांच्या वापरानंतरही मऊ राहतात. त्यामुळे जिममध्ये व्यायाम करताना असो, जॉगिंग करताना असो या धावताना असो, कोणत्याही वेळी संगीताचा मनसोक्त आनंद घेऊ शकता. सुस्पष्ट ध्वनीचा आनंद देऊ करणाऱ्या या हेडफोनमध्ये असलेल्या नॉईस कॅन्सलेशन फंक्शनमुळे पार्श्वभूमीवरील गोंगाटाचा अडथळा न होता संगीताचा आनंद घेता येतो. क्यूएचएम ४८५ला अॅडजस्टेबल माईकही लाभला असल्याने गाणी ऐकताना कॉलला उत्तर देणेही शक्य होते. ब्लॅक अँड व्हाईट रंगामध्ये उपलब्ध असलेल्या क्यूएचएम ४८५ ऑन द इअर फोल्डेबल हेडफोनवर १ वर्षाची वॉरण्टी देण्यात आली आहे. हे हेडफोन आघाडीच्या ई-कॉमर्स पोर्टल्सवर आणि रिटेल स्टोअरमध्ये उपलब्ध आहेत.